# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.५८२ दिनांक ११/०७/२०२०

## पालघर जिल्हा, ठाणे जिल्हा तसेच मुंबई परीसरातील वाईन शॉप्समधे घरफोडी चोरी करणा-या चोरट्यांना माणिकपुर पोलीसांनी केले जेरबंद.

दिनांक १७/०६/२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजता ते दिनांक १८/०६/२०२० रोजी सकाळी १०.०० वा.चे दरम्यान माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीतील सनी वाईन शॉप, शॉन नं.१ गोल्डण को.ऑप.हौ.सोसा. बिल्डींग नं अे/११ वसंत नगरी, वसई पूर्व ता. वसई जि. पालघर येथे कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी मॅनेजर म्हणुन काम करत असलेल्या सनी वाईन शॉप, शॉन नं.१ गोल्डण को.ऑप.हौ.सोसा. बिल्डींग नं अे/११ वसंत नगरी, वसई पूर्व ता. वसई जि. पालघर या शॉपचे बाहेरील जाळीचे लोखंडी गेटचे कुलुप तसेच आतील लोखंडी शटरचे दोन्ही साईटचे लोखंडी पट्टया तोडुन शॉप फोडुन त्याव्दारे आत प्रवेश करुन देशी विदेशी दारुच्या बॉटल तसेच रक्कम असा एकुण ७,९१,१००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांच्या संमती शिवाय लबाडीच्या इराद्याने स्वत:च्या फायदयाकरीता घरफोडी चोरी करुन चोरुन नेला म्हणुन दिनांक १८/०६/२०२० रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.नं. I २३१/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३८०, ४५४, ४५७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधिक्षक, पालघर तसेच श्री. विजयकांत सागर, अपर पोलीस अधिक्षक, वसई व श्रीमती डॉ.अश्विनी पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली माणिकपुर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सदर गुन्ह्याचे तांत्रिक विश्लेषन करुन दहीसर, काशिमीरा, वालीव परीसरांमधे दिवस-रात्र सर्च ऑपरेशन राबवुन व उपलब्ध गुप्त माहीतीच्या आधारे ईसम नामे (१)महावीरसिंग जोरसिंग कुमावत (राजपुत), वय-३२ वर्षे, रा-रुम नं. ४, ए वन हॉटेल, फुलवाडी, मक्का मजिद, उदना दरवाजा, जि. सुरत, राज्य गुजरात (२) मनिष विरेंद्र सरकार, वय-३५ वर्ष, रा-रुम नं- ३०१, साधना बिल्डींग, वलाई पाडा, संतोष भुवन, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर यांना दिनांक:-०४/०७/२०२० रोजी ताब्यात घेतले असता सदर आरोपीतांना विश्वासात घेवुन सखोल चौकशी केली असता सदर आरोपीतांनी नमुद गुन्हा त्यांच्या अन्य एका साथिदारा सोबत मिळुन केलेला असल्याची कबुली दिलेली असुन सदर आरोपीतांनी मिळुन दहीसर(मुंबई), व काशिमीरा पोलीस ठाण्याच्या हद्दीमधे देखील अश्याच प्रकारे ०२ वाईन शॉपचे दुकानांमधे घरफोडी चो-या केलेल्या असल्याची कबुली दिलेली आहे. सदर आरोपीतांकडुन गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन, रोख रक्कम तसेच वाईन शॉप्स मधुन चोरी करुन नेलेल्या मद्याचा साठा असा एकुण ३,२०,१०६/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. तसेच नमुद आरोपीतांनी खालील नमुद गुन्हयाची कबुली दिलेली आहे.

१) काशिमीरा पोलीस ठाणे गु.र.नं. ४५०/२०२० भा.दं.वि.स.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे

२) दहीसर पोलीस ठाणे गु.र.नं. ६२२/२०२० भा.दं.वि.स.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे

वरील कामगिरी माणिकपुर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, पोलीस निरीक्षक विलास सुपे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा.पो.निरी./सचिन सानप, पो.उप.निरी./उमेश भागवत, सहा.फौज/बाळु बांदल, पो.हवा./शैलेश पाटील, पो.ना/कपिल नेमाडे, पो.ना/अशोक वळवि, पो.ना./कल्पेश कीणी, पो.कॉं./कीरण आव्हाड यांनी दिवस-रात्र अथक परीश्रम घेवुन सदरची कामगिरी पार पाडलेली आहे.